महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
मानव संसाधन विभाग
प्रकाशगंगा, प्लॉट नं. सी- १९, इ-ब्लॉक, २ रा मजला, बांद्रा-कुर्ला-कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५१.
फोन नं.(०२२) २६५९८५९५/ २६५९५००० फॅक्स (०२२) २६५९८५८७/२६५९२००१

# प्रशासकीय परिपत्रक क्र.२१७ दिनांक २८.०६.२०१० .

महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या आधारे तत्कालीन म.रा.वि.मंडळाच्या पुनर्रचित कंपनीच्या कर्मचाऱ्यांसाठी सुधारित दराने महागाई भत्ता मंजूर केला जातो.

२. आता शासन निर्णय वित्त विभाग क्र.मभवा-१११०/प्र.क्र.७९/सेवा-९ दिनांक २२.०६.२०१० अन्वये महाराष्ट्र शासनाने, शासनाच्या सर्व कर्मचाऱ्यांना दिनांक ०१.०६.२०१० पासून वेतनश्रेणीतील मूळ वेतनाच्या २७% ऐवजी ३५% या सुधारित दराने शासकीय कर्मचा-यांना महागाई भत्ता मंजूर केला आहे.

३. शासनाच्या धर्तीवर म.रा.विद्युत पारेषण कंपनी मर्यादित मधील सर्व कर्मचाऱ्यांना २७% ऐवजी ३५% दराने दिनांक ०१.०६.२०१० पासून महागाई भत्त्यात वाढ देण्याबाबत कार्यकारी संचालक (मा.सं.) आणि संचालक (वित्त) यांच्याशी विचार विनिमय करुन व्यवस्थापकीय संचालक, म.रा.विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांनी मंजुरी दिली आहे.

४. सुधारित महागाई भत्ता माहे जून, २०१० च्या वेतनापासून देण्यात यावा. तसेच जून, २०१० च्या वाढीव महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम माहे जुलै, २०१० च्या वेतनाबरोबर अदा करण्यात यावी.

५. संबंधित अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी महागाई भत्त्याची वाढीव रक्कम प्रदान करण्यासाठी आवश्यक असलेल्या निधीसाठी श्री.आर.जे. पवार, सहाय्यक महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) यांचेकडे वरील पत्त्यावर त्वरित मागणी करावी.

(सु. द. मोने) २८.६.१०
मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.)

प्रती,
म.रा.विद्युत पारेषण कंपनी मर्यादितच्या
मुख्य कार्यालयातील व क्षेत्रिय कार्यालयातील प्रेषण यादीप्रमाणे.

D:\c drive data\PAY-BILL-GR1\Circular.doc